जा.क्र. प्राफसंके/आंबा/दरपत्रक/ 1788 /२०२०
प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले
दिनांक : 12 JUN 2020

प्रति,

---------------------------------------------
---------------------------------------------
---------------------------------------------

विषय :- रासायनिक खते खरेदी करणेसाठी दरपत्रक पुरविण्याबाबत....

महाशय,

प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले अंतर्गत आंबा विभागाकरीता सन २०२०/२१ च्या पावसाळी हंगामासाठी रासायनिक खते खरेदी करावयाची आहेत. सदर रासायनिक खते आपण काय दराने पुरवाल त्याबाबतचे दरपत्रक निम्न स्वाक्षरीकार यांचे नांवे मोहोरबंद लखोटयातून दिनांक २६/०६/२०२० रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत पोहोचेल अशा रीतीने पाठवावे.

| अ.क्र. | रासायनिक खतांचा तपशील | खरेदीचे प्रमाण |
|---|---|---|
| १. | युरीया | प्रती किलो/प्रती टनाचा दर नमूद करावा |
| २. | सिंगल सुपर फॉस्फेट | |
| ३. | म्युरेट ऑफ पोटॅश | |

अटी व शर्ती :-

१. दरपत्रकात वहातुक भाडे, हमाली यासहीत सर्व करांचा उल्लेख असावा.

२. वर उल्लेख केलेली रासायनिक खते आंबा प्रक्षेत्र कार्यालयामध्ये पोच करावीत.

३. बंद पाकिटावर " रासायनिक खते दरपत्रक - आंबा विभाग" असा स्पष्ट उल्लेख करावा.

४. पुरवठा करण्यात येणारी रासायनिक खते वर्षभर वापरावयाची असल्याने त्यांची क्वालिटी वर्षभर टीकून रहाणे आवश्यक आहे व त्याप्रकारचा माल आपणाकडून पुरवठा होणे बंधनकारक आहे.

५. अंतिम तारखेनंतर या कार्यालयात पोच झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

६. दरपत्रके स्वीकारणे अथवा नाकारणे बाबत अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

७. दरपत्रकासोबत वस्तूचे उत्पादक/प्राधिकृत वितरक /विक्रेते असलेबाबत प्रमाणपत्र जोडावे.

८. दरपत्रक सादर करताना दरपत्रकधारकाने **CST/Maharashtra VAT/GST** क्रमांक नमूद करावा. तथापी CST/Maharashtra VAT/GST क्रमांक लागू नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक असलेल्या लेटरहेड दरपत्रक सादर करावे.

९. दरपत्रकासोबत पॅनकार्ड व आधारकार्डची झेरॉक्स प्रत सादर करणे बंधनकारक राहील.

आपला विश्वासू,

सहयोगी संशोधन संचालक
प्रादेशिक फळ संशोधन केंद्र
वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग.